| MHBI100021212022 | सं.फौ.ख.नं.४५०/२०२२ |
|---|---|
| | बाबासाहेब सोनवणे<br>**विरुध्द**<br>जनार्धन तपसे |

**आदेश नि. ४० वरील**

सदरचा अर्ज फिर्यादीतर्फे नि. ४० वरील अधिकचा सरतपास नोंदवण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. फिर्यादी यांनी असे कथन केले की, फिर्यादीने त्यांचे सरतपासाचे शपथपत्र दाखल केलेले आहे, परंतु त्यावर अधिकचा सरतपास घेवून कागदपत्रास निशाणी देण्याचे राहुन गेलेले आहे. फिर्यादीने दाखल केलेले कागदपत्रास निशाणी देवून ते पुराव्यात न वाचल्यास त्यांचेवर अन्याय होवून अतोनात नुकसान होणार आहे. त्यामुळे फिर्यादी यांनी त्यांना अधिकचा सरतपास नोंदवण्यास परवानगी मिळावी, अशी विनंती केली आहे.

३. आरोपी यांनी नि.क्र. ४६ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन कथन केले की, फिर्यादीने नोंदवलेल्या सरतपासानंतर आरोपीविरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारित करण्यात आलेला असून तो आदेश अद्याप कायम आहे. आरोपीने सदर आदेश रद्द करण्याबाबत मागणी केलेली नाही. फिर्यादी यांनी उलटतपास नाही हा आदेश पारित होण्यापुर्वी अधिकचा सरतपास देणे कायदयाप्रमाणे आवश्यक होते. फिर्यादीचा सरतपास बंद झाल्यानंतर पुन्हा परवानगी मागण्याचा कोणताही अधिकार नाही. फिर्यादी अधिकच्या सरतपासाच्या परवानगीद्वारे प्रकरणातील त्रुटी भरुन काढण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. याच मागणीसाठी नि. ३३ वर फिर्यादी यांनी अर्ज दाखल केला होता व तो अर्ज फिर्यादीने स्वत:हुन काढुन घेतलेला आहे. त्यामुळे त्याच मागणीसाठी पुन्हा अर्ज देण्याचा अधिकार फिर्यादीस नाही. अर्जातील कारण चुकीचे असून

बेकायदेशीर आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती आरोपीने केलेली आहे.

४. फिर्यादी व आरोपीतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

५. सदरची केस आरोपीविरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस् ॲक्टचे कलम १३८ नुसार दाखल करण्यात आलेली आहे.

***फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३११ - महत्वाच्या साक्षीदारास समन्स काढण्याचा किंवा हजर असलेल्या व्यक्तीची साक्षतपासणी करण्याचा अधिकार -***

*कोणतेही न्यायालय या संहितेखालील कोणतीही चौकशी, संपरिक्षा किंवा अन्य कार्यवाही कोणत्याही टप्प्यात असताना कोणत्याही व्यक्तीला साक्षीदार म्हणून समन्स काढू शकेल अथवा समक्ष हजर असलेल्या कोणत्याही व्यक्तीला साक्षीदार म्हणून समन्स काढलेले नसले तरी तिची साक्षतपासणी करु शकेल, अथवा आधीच साक्ष तपासणी केलेल्या व्यक्तीला परत बोलावून तिची फेरतपासणी करु शकेल; आणि अशा कोणत्याही व्यक्तीचा साक्षीपुरावा खटल्याचा निर्णय न्याय्यपणे होण्यासाठी अत्यावश्यक आहे असे दिसून आले तर, न्यायालय तिला समन्स काढुन तिची साक्ष तपासणी करील किंवा पुन्हा बोलावून फेरतपासणी करील.*

६. प्रस्तुत प्रकरणात दि. १५.०७.२०२३ रोजी फिर्यादीतर्फे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. २३ वर दाखल करण्यात आले आहे. त्यानंतर दिनांक २१/१२/२०२३ रोजी नि.क्र. २३ वर आरोपीतर्फे फिर्यादीचा उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला. प्रकरणात फिर्यादी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. प्रकरण चेकवरील रक्कमेसंबंधीत आहे. प्रकरणाचे योग्य निकालाकरिता फिर्यादीतर्फे साक्षीदार बाबासाहेब अच्युतराव सोनवणे यांना त्यांचा अधिकचा सरतपास देण्याची संधी देणे योग्य व न्यायोचित होणारे आहे. अशी संधी फिर्यादी यांना दिल्यामुळे आरोपीचे कोणतेही नुकसान संभवत नाही. करिता न्यायाच्या दृष्टीकोनातून मी पुढील आदेश पारीत करते.

**सं.फौ.ख.नं.४५०/२०२२**

**<u>आदेश</u>**

१. अर्ज, आरोपीस रक्कम रु.८००/- (रुपये आठशे फक्त) खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. फिर्यादी यांनी पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम व अधिकचा सरतपास न दिल्यास, सदर आदेश आपोआप रद्द समजण्यात येईल.

सही/-

दिनांक - २१.१२.२०२४

(एस. व्ही. पावसकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 21.12.2024

Transcribed on : ---------------

Checked & signed on : 21.12.2024

Sd/-

(S. S. Nakhate),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.